MHKO090001382011 रे.क.नं.क्रं. ६४/२०११

रे.क.नं.क्रं. ६४/२०११ नि. ६० खाली आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ प्रमाणे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी दाखल केला आहे. सदर दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदर कामी वादी नं. १० गुंडू बाबाजी भोगुलकर हे दि. ०४.०६. २०१७ रोजी मयत झाले आहेत तर वादी नं.१९ श्री.सतबा संतू केरकर हे दि. १७.१०. २०१५ रोजी मयत झाले आहेत. त्यांना खालील प्रमाणे वारस आहेत.

१०—अ) श्रीमती सरस्वती गुंडू भोगुलकर
व.व.६०, धंदा—शेती, रा.दर्डेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर

१९—अ)श्री. संभाजी सतबा केरकर,
व.व.६२ धंदा शेती, रा. सदर
१९—ब)श्री.राजाराम सतबा केरकर,
व.व.४८ धंदा—शेती रा.सदर

वरील प्रमाणे मयत वादी नं. १० व १९ यांना सरळ व कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे सदर दाव्यात वारसांची नोंद व्हावी म्हणून सदर अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी आपले लेखी म्हणणे दाखल केले आहे. वादी रेकॉर्डवर आणलेले वारस हे मुदतीत नाहीत. तसेच कोणताही कागदोपत्री दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांचे अर्जावरून मयत प्रतिवादी नं. ८ बाळाबाई बंडू सासणे यांना सदर अर्जात नमूद प्रतिवादी नं. ८—अ व ८—ब वारस आहेत हे स्पष्ट होते. दावेचे निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरीत्या संपूष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे. परंतु अर्ज हा मुदतीत दाखल केला नसल्याने वादीवर रक्कम रू. १००/— खर्च बसवून मंजूर करीत आहे.

४. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज वादी यांना रक्कम रू.१००/— कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

सही/—

दिनांकः— ०९/०१/२०१९.

( यामीनी बोरावके )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
गडहिंग्लज.